पिंपरी चिंचवड महानगरपालिका, पिंपरी ४११०१८

मा. " अ " प्रभाग समिती

विशेष सभा कार्यपत्रिका क्रमांक ०१

सभावृत्तांत

दिनांक – ०९/१०/२०२० वेळ : स.११.३० वा.

---

पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या मा. " अ " प्रभाग समितीची मा.सभापती निवडीची विशेष सभा **शुक्रवार** दिनांक **०९/१०/२०२०** रोजी सकाळी ११.३० वा. महानगरपालिकेच्या प्रशासकीय इमारती मधील दिवंगत महापौर मधुकरराव पवळे सभागृह, मुख्य इमारत, पिंपरी चिंचवड महानगरपालिका, पिंपरी ४११ ०१८ या ठिकाणी **मा.श्रीम.प्रेरणा देशभ्रतार, (भा.प्र.से)** पिठासीन अधिकारी तथा आयुक्त, अपंग कल्याण, पुणे यांचे अध्यक्षतेखाली अवर सचिव महाराष्ट्र शासन, नगरविकास विभाग यांचेकडील पत्र क्र.कोरोना-२०२०/प्र.क्र.७६/ नवि-१४, दि.०९ सप्टेंबर २०२० चे पत्रान्वये सुचित केलेप्रमाणे ऑनलाईन पध्दतीने व्हिडीओ कॉन्फरन्सींगद्वारे आयोजित करणेत आली होती. सदर सभेस खालील सन्मा. काही सदस्य प्रत्यक्ष सभागृहात तर काही ऑनलाईन पध्दतीने उपस्थित होते.

१) मा.अनुराधा गणपत गोरखे
२) मा.केशव हनुमंत घोळवे
३) मा.तुषार रघुनाथ हिंगे
४) मा.शैलजा अविनाश मोरे
५) मा.बाबर शर्मिला राजू
६) मा.कोमल दिपक मेवानी
७) मा.शितल ऊर्फ विजय गोरख शिंदे

या शिवाय मा.चंद्रकांत इंदलकर, क्षेत्रीय अधिकारी, " अ " प्रभाग समिती, मा.श्रीमती.सुचिता पानसरे, प्रशासन अधिकारी " अ " प्रभाग समिती कार्यालय, हे अधिकारी उपस्थित होते.

--------

**पिठासीन अधिकारी तथा आयुक्त अपंग कल्याण, पुणे** — सन्मा. सदस्य, क्षेत्रीय अधिकारी, उपस्थित सर्व अधिकारी यांचे स्वागत करते. आजच्या सभेत प्रभाग समितीचे सभापती पदावर नेमणूक करणेचा विषय आहे. यासाठी मा.विभागीय आयुक्त यांनी सभेचा पिठासीन अधिकारी म्हणून माझी या ठिकाणी नेमणूक केलेली आहे. " अ " प्रभाग समितीच्या सभापती पदाची निवडणूक मुक्त व निर्भयपणे पार पाडण्यासाठी कामकाजाची लेखी नोंद घेणेबरोबरच त्या कामकाजाची व्हिडीओ चित्रणाद्वारे देखील नोंद घेण्याची व्यवस्था ठेवणेत आलेली आहे.

**प्रभाग समिती सचिव यांनी कामकाज** सुरु करावे अशी सुचना **करते.**

| | |
|---|---|
| प्रशासन अधिकारी तथा सचिव (सभाशाखा ) | मा. " अ " प्रभाग समितीचे सभापती पदावर महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम कलम २९ अ (४) नुसार नेमणूक करणे.<br><br>" अ " प्रभाग समितीचे सभापती पदाकरीता मुदतीत दाखल झालेली एकूण ०२ (दोन) नामनिर्देशन पत्रे पिठासीन प्राधिकारी यांचेकडे छाननी करणेकामी सुपुर्त करण्यात येत आहेत.<br><br>( प्रशासन अधिकारी तथा सचिव, सभाशाखा यांनी त्यांना प्राप्त झालेली एकूण ०२ (दोन) नामनिर्देशन पत्रे मा.पिठासीन अधिकारी यांचेकडे सुपुर्त केली.) |
| पिठासीन अधिकारी तथा आयुक्त, अपंग कल्याण, पुणे | पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या " अ " प्रभाग समितीचे सभापती पदाकरीता एकूण ०२ (दोन) नामनिर्देशन पत्रे मुदतीत दाखल झालेली आहेत. त्यामध्ये उमेदवार, त्यांचे सुचक, अनुमोदक यांची नावे पुढील प्रमाणे आहेत. |

| अ क्र | उमेदवाराचे नाव | सुचकाचे नाव | अनुमोदकाचे नाव |
|---|---|---|---|
| १ | बाबर शर्मिला राजू | अनुराधा गणपत गोरखे | केशव हनुमंत घोळवे |
| २ | बाबर शर्मिला राजू | तुषार रघुनाथ हिंगे | शैलजा अविनाश मोरे |

मा. " अ " प्रभाग समिती सभापती पदासाठी मुदतीत प्राप्त झालेल्या एका उमेदवाराच्या ०२ (दोन) नामनिर्देशन पत्रांची छाननी करणेत आली असुन सदर नामनिर्देशन पत्रे परिपूर्ण असून त्यावर उमेदवाराचे नाव, पत्ता, प्रभाग क्रमांक नमुद आहे. तसेच नामनिर्देशन पत्रांवर उमेदवाराची स्वाक्षरी आहे. त्याचप्रमाणे नामनिर्देशन पत्रांवर समितीच्या एका सदस्याने सुचक म्हणून स्वाक्षरी केली आणि समितीच्या दुस-या सदस्याने अनुमोदक म्हणून स्वाक्षरी केलेली आहे. सबब सदरची नामनिर्देशन पत्रे वैध असून स्विकृत करण्यात येत आहेत. त्यामध्ये मा. " अ " प्रभाग समिती सभापती पदाची निवडणूक लढविणा-या **मा.बाबर शर्मिला राजू** ह्या एकच रितसर वैधपणे नामनिर्देशित उमेदवार आहेत.

**- नामनिर्देशन पत्र माघारी घेणे -**

उमेदवारास १५ मिनिटांच्या आत त्यांनी सही केलेली लेखी नोटीस मा.पिठासीन अधिकारी यांजकडे देऊन त्यांची उमेदवारी मागे घेता येईल अशी नियमात तरतूद आहे. उमेदवारी मागे घेण्यासाठी विचारणा करण्यात आली.

## - उमेदवार निवडून आल्याची घोषणा -

नामनिर्देशनपत्र माघारी घेण्याचा कालावधी संपला आहे. या कालावधीमध्ये उमेदवाराने उमेदवारी मागे घेतलेली नाही. सबब मा. " अ " प्रभाग समिती सभापती पदाची निवडणूक लढविणा-या **मा.बाबर शर्मिला राजू** ह्या एकच रितसर वैधपणे नामनिर्देशित उमेदवार आहेत. यास्तव **मा.बाबर शर्मिला राजू** यांची पिंपरी चिंचवड महानगरपालिकेचे " अ " प्रभाग समिती सभापती पदावर रितसर वैधरित्या **बिनविरोध** निवड झाल्याचे मी प्रेरणा देशभ्रतार, पिठासीन अधिकारी, " अ " प्रभाग समिती (विशेष सभा) जाहीर करते.

----------

ठराव क्रमांक – १

दिनांक – ०९/१०/२०२०

विषय क्रमांक – १

विभाग – प्रशासन

पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या मा. " अ " प्रभाग समिती सभापती पदाकरीता मुदतीत दाखल झालेल्या व वैध ठरलेल्या नामनिर्देशन पत्रामधील मा. " अ " प्रभाग समिती सभापती पदाची निवडणूक लढविणा-या **मा.बाबर शर्मिला राजू** ह्या एकच रितसर वैधपणे नामनिर्देशित उमेदवार असल्याने **मा.बाबर शर्मिला राजू** यांची पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या " अ " प्रभाग समिती सभापती पदावर रितसर वैधरित्या बिनविरोध निवड झाल्याचे जाहीर करणेत येत आहे.

( प्रेरणा देशभ्रतार, भा.प्र.से.)
पिठासीन अधिकारी तथा
आयुक्त, अपंग कल्याण, पुणे
" अ " प्रभाग समिती
पिंपरी चिंचवड महानगरपालिका

पिंपरी चिंचवड महानगरपालिका
" अ " क्षेत्रीय कार्यालय,
क्रमांक : अक्षेका/१/कावि/ ७८ /२०२०
दिनांक : ०९/१०/२०२०

प्रशासन अधिकारी
तथा सचिव सभा शाखा
" अ " प्रभाग समिती
पिंपरी चिंचवड महानगरपालिका

प्रत – सर्व संबंधित शाखाप्रमुख व शाखाधिकारी यांचेकडे पुढील योग्य त्या कार्यवाहीसाठी रवाना.